# लेखकाचे पूर्व प्रसिद्ध साहित्य

## अमृतानुभव व चांगदेव पासष्टी

### प्रस्तावना सारांश

१) आकलन करण्यास अतिकठीण हा ग्रंथ आहे. कारण या ग्रंथाची भाषा सिद्धभाषा आहे. परंतु अशा कठीण भाषेतील ग्रंथ सामान्य जनांना सुलभ व्हावा म्हणून आमचे परमस्नेही श्री. विजय पांढरे साहेब (B.E.Civil) यांनी पद्यानुवाद करुन सामान्यांवर उपकारच केला आहे. अमृतानुभवाच्या ओव्यांची भाषा अति कठीण व क्लिष्ट आहे. परंतु पांढरे साहेबांनी आपल्या सरळ व सोप्या लोकभाषेत त्यांचा पद्यानुवाद केला आहे. म्हणून हा ग्रंथ यामुळे सोपा झाला आहे. तरी वाचकांनी व अमृतानुभवाच्या रसिकांनी हा ग्रंथ आपल्या पदरी ठेवून ज्ञानार्जन करावे. हीच सदिच्छा व या पवित्र कार्याला शुभाशीर्वाद.

स्वामी श्री.हरिचैतन्यजी महाराज

बुलढाणा

---

२) अमृतानुभवातील तीन, चार, सहा, सात, आठ ही प्रकरणे विशेष अवघड आहेत. म्हणून मी ती अधिक काळजीपूर्वक वाचलीत. मूळ अमृतानुभव व त्यावरील शिवकल्याणाची टीका यांच्या आधारावर मी तुमचे रुपांतर वाचले. तुम्हाला अमृतानुभव कळले याची खात्री वाटली. तुमच्या या प्रयत्नामुळे दुर्बोधतेच्या कारणाने बिचकणारा वर्ग अमृतानुभवाबध्दल आपुलकी बाळगू लागेल असा मला विश्वास आहे.

राम शेवाळकर

---

३) अमृतानुभव आणि चांगदेव पासष्टी ही दोन्ही काव्ये तुम्ही नुसत्या भक्तिभावानेच नव्हे, तर अतिशय बारकाईने अभ्यासलेली आहेत. बौध्दिक कोरडेपणाने केलेला हा अभ्यास नसून त्यात उच्च दर्जाच्या काव्यानंदाने रंगून जाणे आहे.

या सुलभीकरणाच्या निमित्ताने अमृतानुभव आणि चांगदेव पासष्टीच्या सहवासात तुम्ही मग्न होता हा तुमच्या आयुष्यातला परम भाग्याचा काळ होता. तुमचे हे सुलभीकरण वाचण्याच्या निमित्ताने हे भाग्य मलाही लाभले. हे सुलभीकरण वाचताना मी अतिशय आनंदात होतो. या आनंदाची जातच वेगळी ! त्याचा हिशोब होत नाही. लालसा बाळगून तो लाभत नाही. तो पराक्रमाने मिळवता येत नाही आणि हावरेपणाने गिरवता येत नाही.

मंगेश पांडगांवकर

---

४) हा अवघा अमृतानुभव विलक्षण आहे. तो श्री. विजय पांढरे यांनी सुलभपणे शब्दबद्ध केला आहे. अद्वैतातला हा निखळ आत्मानुभव शब्दात पकडणे सोपे नाही. पांढरे यांचे मन या अनुभवाने संतृप्त झाले. नि त्यांना तो अनुभव जसा भावला तसा तो त्यांनी मांडला. अमृतानुभवाच्या काठापर्यंत या पुस्तकाने सामान्य भाविकाला जाता येईल. अमृतानुभवात डुबी घ्यायची-नि ती कितपत घ्यायची हे ज्याचे त्याने ठरवायचे. या अनुभवाच्या सुलभीकरणासाठी पांढऱ्यांचे परिश्रम लक्षात येतात. यात त्यांना मनापासून आनंद वाटला ते ज्ञानदेवांचे भक्त झाले. त्यांना यात धन्यता वाटली ती त्यांनी आपल्यापुरती मर्यादित न ठेवता साऱ्यांना मुक्त केली. यामुळे रसिकाला अमृतानुभव काय आहे हे समजावे.

डॉ. यशवंत पाठक

---

५) दोन्ही ग्रंथांच्या वाटेला सहसा कोणी बुद्धिजीवी (intellectual) फारसा जात नाही व गेला तरी तो अनेक ठिकाणी अडखळून तो नाद सोडून तरी देतो किंवा गोंधळलेल्या अवस्थेतच राहतो. श्री ज्ञानदेवांचा दृष्टिकोन ज्याला उलगडला, गोंधळ मिटला, काही आंतरिक अनुभूती झाली, मनाची धावाधाव थांबली, असा भाग्यवान क्वचितच. वरवर बोलणारे, भाषणे देऊ शकणारे, लेख किंवा पुस्तके लिहिणारे पुष्कळ.

जंव निरार्तता नाही । तंव व्यापारू असे पाही ।
मग संतुष्टीच्या ठायी । कुंठे सहजे ॥

हे ज्यांना उमगले अशा दुर्मिळ साधकांच्या पैकी श्री. विजय पांढरे हे एक आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही.

कालिदास जोशी



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# भावार्थ गीता

## प्रस्तावना सारांश

गीतेचा हा सत्यान्वेषणाचा मार्ग अति दिव्य आहे व दिव्यत्व प्राप्त करुन देण्यास सक्षम आहे. परंतु ती गीता तर संस्कृतमध्ये आहे ती कळणार कशी? यासाठी तिला सरळ सोप्या भाषेत ओवीबद्ध करुन श्री. विजय पांढरे यांनी मोठे मोलाचे कार्य केले आहे. त्यांना मी हाच आशीर्वाद देतो की प्रभु त्यांच्याकडून असेच ग्रंथलेखनाचे कार्य करुन घेत राहो. हा ग्रंथ सर्वांसाठी अति उपयुक्त आहे. म्हणून वाचकांनी या ओवीबद्ध ग्रंथाला आपल्या संग्रही ठेवावे. पुन्हा एकदा श्री. विजय पांढरे यांना शुभआशीर्वाद देतो व आशीर्वचनाला येथेच थांबवतो.

स्वामी श्री. हरिचैतन्यजी महाराज
पळसखेड, बुलढाणा

---

ओवीबद्ध भावार्थ गीता हा आपणाकडून लिहिला गेलेला प्रासादिक असा मायठेवा भावगंध वाचताना मनस्वी आनंद झाला. मला वाटते आपला हा ग्रंथ म्हणजे गीतेचा तो स्वाभाविक सुखदायी अविष्कार आहे. या अविष्काराशी शरणागती भावाने पूर्णपणे जो तादात्म्य पावतो तोच जीव धन्य म्हणावा लागेल आणि अशा जीवालाच गीतेचा भावार्थ ज्ञात होत असतो. प्रासादिक लिखाण म्हणजे ईश्वर शक्तीशी पूर्णपणे तद्रूप झाल्याचे ते परिपक्व फळ आहे. त्याची गोडी स्वयंसिध्दच आहे. ईश्वरकृपेचे जणू दूर्वांकूर म्हणजेच ओवीबध्द भावार्थ स्वत:सहित इतरांनाही या अविष्कृतीने पूर्ण समाधान, तृप्ती लाभणे हाच खरा अभिप्राय मानावा.

प. पू. आगाशे काका, खामगांव

---

श्री. विजय पांढरे यांनी आपल्या मनोगतात स्पष्ट सांगितले आहे. ते म्हणतात, ज्याला आपण मी मी म्हणतो ती नेमकी काय गोष्ट आहे, त्या 'मी'ची निर्मिती कशी होते, वाढ कशी होते, त्या मीचा अंत कसा होतो, तो मी कसा जन्म घेत फिरतो, त्या 'मी'ची संपूर्ण प्रक्रिया नेमकी काय आहे हे सर्व स्वत:च्या अनुभूतीवर अंतरंगात प्रत्यक्ष जाणणे म्हणजे गीता जाणणे होय. श्री. विजय पांढरे हे आधी या चिंतनमननात बुडी घेतात आणि मगच गीतेच्या ओवीबद्ध भावार्थाचे लेखन करतात. त्यामुळे त्यांनी रचलेली ही ओवीबद्ध भावार्थ गीता ही बौद्धिक-शाब्दिक कारागिरी नाही. ही ओवीबद्ध भावार्थगीता हा त्यांच्या आंतरिक साधनेचा प्रवास आहे. आईच्या मायेचा हात पाठीवरुन फिरावा त्याप्रमाणे या आंतरिक साधनेच्या मायेचा हात या अनुवादाच्या पाठीवरुन फिरला आहे. महाराष्ट्रात गीतेच्या अध्ययनचिंतनाची थोर परंपरा आहे. ज्ञानेश्वरी, लोकमान्य टिळकांचे 'गीतारहस्य' आणि आचार्य विनोबा भावे यांची 'गीताई' हे तीन ग्रंथ या महान परंपरेचे अमृतकलश आहेत. या थोरांच्या वाटेवर आपली बाळपावले या 'ओवीबद्ध भावार्थगीते'च्या रुपाने टाकून श्री. विजय पांढरे प्रवासाला निघाले आहेत. त्यांच्या या बाळपावलांचे कौतुक करावे असे वाचकांना निश्चितच वाटेल.

मंगेश पांडगांवकर, सायन, मुंबई

---

श्री. मा. विजय बळवंत पांढरे, बी. ई. (सिव्हील) यांनी अत्यंत स्तुत्य असा उपक्रम केलेला आहे. गीता मूळात संस्कृतमध्ये असल्यामुळे संस्कृतचा ज्यांना गंधही नाही असा मोठा समाज त्यातील गूढता समजण्यास वंचितच राहातो म्हणून त्यांनी केलेले हे समाजोद्धारक कार्य निश्चितच प्रशंसनीय आहे. त्यांनी केलेल्या भाषांतरामध्ये सहजता व अतिशय सोपेपणा दृष्टोत्पत्तीस आला मा. अधीक्षक अभियंता यांनी या श्रेष्ठ बुद्धीतून केलेले हे बहुतांशी समश्लोकीय सर्वांनाच गीताज्ञानाचे भांडार सहजप्राप्य ठरल्याशिवाय रहाणार नाही. त्यांनी अशाच प्रकारचे लिखाण अमृतानुभव व चांगदेवपासष्टी विषयी केलेले आहे तेही अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे व अध्यात्माच्या अभ्यासकांना तत्वमसि साक्षात्काराची उकल होण्यास निश्चितच लाभदायी ठरेल. असेच लिखाण सर्व समाजाला दृष्टीपुढे ठेवून त्याची सहजता, सरलता त्यांचेकडून प्रकट व्हावी ही भगवंताचे चरणी प्रार्थना आहे.

प. पू. नारायणकाका ढेकणे, नाशिक

---

श्री. विजय बळवंत पांढरे यांचे हे धाडस कौतुकास्पद आहे. श्री. पांढरे यांचेवर साक्षात् भगवान् श्रीकृष्णाची कृपा झाली, असे म्हणावेसे वाटते, कारण त्याशिवाय इतका सुंदर अनुवाद सहज स्पष्टरितीने उतरणार नाही. हे सर्व संस्कृत भाषेतून घडले. आज आपण ज्या स्थितीत आहोत. त्या स्थितीत संस्कृत कळणे अवघडच. पण मराठीपण नीट अवगत होणे दुर्घट होते अशा परिस्थितीत ग्रामीण जनतेलाही सुलभपणे कळेल अशा भाषेत श्री.पांढरे यांनी भगवत् गीतेला मराठीत अनुवादीत केले हे त्यांचे कार्य अत्यंत उज्वल, लोक कल्याणकारी व स्वत:चाही उध्दार करुन देणारे आहे. म्हणूनच पुन्हा एकदा म्हणावेसे वाटते की अनुवाद करताना त्यांचेवर खरोखरच भगवान श्रीकृष्णाची कृपा झाली असावी.

स्वामी विद्यानंद, पो. वडकी, ता. हवेली, जि. पुणे.

---



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com